## वासाहतिक समाजातील शेतकरी प्रश्न

# प्रकरण चौथे

## म.फुले आणि लोकमान्य टिळक यांचे शेतीप्रश्न विषयाचे विचार तौलनिक आणि टीकात्मक अभ्यास.

## प्रकरण चार

## म.फुले आणि लोकमान्य टिळक यांचे शेतीप्रश्न विषयाचे विचार तौलनिक आणि टीकात्मक अभ्यास.

### १) प्रस्तावना:

१९व्या शतकामध्ये ब्रिटीशांचे राज्य स्थापन झाल्यावर एकूण महाराष्ट्रीय जीवनावर अनेक बरे वाईट परिणाम घडून आले. ब्रिटीशांच्या राज्यापूर्वी सुध्दा अनेक टोळयांनी व राजांनी महाराष्ट्रावर राज्ये स्थापन करण्याचा प्रयत्न केला. परंतु या सर्वापेक्षा ब्रिटिशांचे राज्य हे वेगळे होते. हे एकछत्री अंमल करणारे राज्य व्यापारी तत्त्वावर आधारित होते. या व्यापारी तत्त्वाचाच अंमल करुन त्यांनी महाराष्ट्रीय शेतक-यांची आर्थिक लुबाडणूक करण्याचा प्रयत्न केला होता.

ब्रिटीशांच्या अंमलाखालील शेतीव्यवस्थेमध्ये फारशा सुधारणा झाल्या नाहीत. मात्र काही त्यांनी सुधारणा करण्याचा प्रयत्न केला यासाठी त्यांनी महाराष्ट्रामध्ये रयतवारी पध्दत लागू केली व शेती शेतक-यांच्या मालकीची करुन जास्तीत जास्त शेतसारा मिळविण्याचा प्रयत्न केला. जमिन शेतक-यांच्या मालकीची झाल्यावर त्यातून जास्तीत जास्त धान्य मिळविण्याचा प्रयत्न शेतक-यांनी केला परंतु त्यासाठी आवश्यक असणा-या आधुनिक ज्ञानाचा, मशागतीचा, बी-बियाणे, खतांचा पुरवठा मात्र सरकारने केला नाही. यामुळे शेतक-यांनी काबाड कष्ट करुन देखील शेतीतून जादा उत्पन्न निघू शकले नाही. ब्रिटीशांनी शेतीचे व्यापारीकरण करण्याचा काही प्रमाणात प्रयत्न मात्र कालावधित केला. यामुळे काही बडया शेतक-यांचा फायदा झाला होता. वारंवार

UNIVERSITY KOLHAPUR

पडणा-या दुष्काळामुळे व पावसावर अवलंबून असणा-या शेती-व्यवस्थेमुळे शेतीच्या उत्पादनातही घट होत होती. ब्रिटीशांनी शेतीला पाणी पुरविण्यासाठी कोणत्याही प्रकारची सोय केली नव्हती.

ब्रिटीश व्यवस्थेमध्ये शेतीमध्ये नवीन सुधारणा झाल्या नाहीत मात्र इतर लघुउद्योग व्यवसाय ही या राजवटीत बंद पडले, सैन्यातील लोकांची संख्या कमी झाली. या सर्वांचा भार शेतीवरच पडला होता. वारंवार पडणारा दुष्काळ, शेतसा-यातील होणारी वाढ व ती भरण्यासाठी सावकारी कर्ज, निरनिराळे कर, या सर्वांमुळे ब्रिटीश राजवटीतील शेतक-यांची स्थिती अतिशय बिकट बनली होती. त्याला या राजवटीमध्ये हलाखीचे जीवन जगावे लागत होते. त्याचे सर्व बाजूनी आर्थिक शोषण होत होते. त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सरकार व सरकारचे साथीदार सर्व बाजूनी त्याची लुबाडणूक करत होते. यामुळेच ब्रिटीश राजवटीमध्ये शेतक-यांची अवस्था ही केविलवाणी झाली होती. त्याला पोटभर अन्न का अंगभर वस्त्र ही मिळणे अवघड झाले होते.

२) <u>वासाहतिक व्यवस्थेमध्ये सापडलेला शेतकरी:</u>

ब्रिटीशांनी हिंदुस्थानावर राज्य स्थापन केल्यावर त्यांनी आपल्या वसाहतवादाची तत्त्वे इतर देशाप्रमाणे हिंदुस्थानालाही लावली व या वसाहतीमधून जास्तीत जास्त आर्थिक उत्पादन मिळविण्याचे धोरण स्वीकारले. याचा परिणाम शेतक-यांवर झाला.

: शेतसा-यातील वाढ, धान्याऐवजी पैशामध्ये सारा वसुली करण्याचे सरकारी धोरण आणि नोकरशाही राज्यव्यवस्थेतील

कडकपणा व सहानुभूतिशून्यता यामुळे शेतकरी या वासाहतिक व्यवस्थेमध्ये आर्थिक कचाटयात सापडला, तो आंतरराष्ट्रीय बाजारपेठेस जोडला गेला. त्यामुळे वासाहातिक समाजात त्याची दुहेरी पिळवणूक होऊ लागली. इंग्रजांनी निर्माण केलेल्या नव्या संस्था त्यांच्या स्वत:च्या फायद्यासाठी होत्या. या संस्थातून निर्माण झालेला एतद्देशीय वर्ग समाज हा साम्राज्यशाहीशी सहयोग करणारा समाज होता. त्यामुळे आपल्या स्वार्थासाठी साम्राज्यशाहीने व तिला साहय करणारा या देशातील वर्ग समाज सावकार, व्यापारी, कमिशन, एजंट, धर्मगुरु, नोकरशाही व इतर वरिष्ठ जातीय वर्ग यांनी शेतक-यांवर प्रचंड प्रमाणात जुलूम केला.

३) इंग्रज साम्राज्यशाही आणि तिचे या देशातील सहकारी आणि तिने शेतक-यांचे केलेले शोषण:

इंग्रजानी महाराष्ट्रावर इतर प्रांतांप्रमाणे आपले साम्राज्य स्थापन केल्यावर ते अधिक बळकट कसे होईल याचा अभ्यास करुन त्याप्रमाणे येथील प्रशासन व्यवस्थेमध्ये योग्य ते बदल केले. शेती हा येथील एकूण आर्थिक जीवनाचा गाभा आहे. हे ओळखून त्या दृष्टीकोनातून त्यांनी आपली साम्राज्यशाही येथे बळकट करण्याचा प्रयत्न केला. त्यादृष्टीने त्यांनी शेतीमधून जास्तीत जास्त महसूल मिळवून आपली आर्थिक स्थिती भक्कम करण्याचा प्रयत्न केला. रयतवारी पध्दती लागू करुन शेतक-या मध्ये दर तीस-तीस वर्षांनी वाढ करुन शेतक-यांची आर्थिक पिळवणूक या साम्राजवादी राजवटीने केली. साम्राज्यवादी धोरणाचे परिणाम म्हणून शेतीव्यवस्थेला असलेले दुय्यम जोडधंदे ही राज्यात बंद पडले व सर्व बेकार लोकांचा भरणा शेतीवरच झाला. शेतक-यांना कोणत्याही प्रकाराच्या

सोयी सवलती न देता करमात्र नियमीत पणे वसूल केले जात होते. याचाच परिणाम म्हणजे शेतक-याची आर्थिक पिळवणूक होत होती व हिचा फायदा इंग्रजी साम्राज्यशाहीचे असलेले सहकारी उदा.नोकरशाही, सावकारशाही व भिक्षुकशाही यांनीही इंग्रजी राजवटीबरोबरच शेतक-याचे आर्थिक शोषण केले.

१) नोकरशाही:

शेतक-यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन इंग्रज अधिका-यांना चुकीची व खोटी माहिती पुरवत. शेतक-यांच्यामध्ये भांडणे लावून त्यांच्याकडून पैसे वसूल करत, नोकरशाहीमध्ये लाच व भ्रष्टाचार यात वाढ झाली होती.

२) सावकारशाही:

शेतकरी अडचणीत सापडल्यावर त्याला भरमसाठ व्याजाने कर्ज देऊन शेवटी त्याच्या जमिनीही सावकार ताब्यात घेत.

३) भिक्षुकशाही:

शेतक-याच्या अशिक्षितपणाचा अज्ञानाचा व अंधश्रध्दाळूपणाचा फायदा घेऊन त्याला खोटे नाटे भविष्य सांगून भूलथापा देऊन शेतक-यांना लुबाडण्याचे कार्य ते करित होते.

त्यामुळे शेतक-यांच्या दयनीय अवस्थेत जास्तच वाढ झाली. वासाहतिक समाजात शेतीचा प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न बनला. इंग्रजांनी निर्माण केलेल्या नव्या बाजारपेठेवर आधारलेल्या, पैशावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेमुळे तो पुरता नागवला गेला. या शेतकरी प्रश्नाचा

मूलगामी विचार गेल्या शतकाच्या शेवटास जोतीराव फुले आणि लो.टिळक यांनी केला. त्यावर उपाययोजना सुचविली. दोघांचे विचार त्यांच्या त्या काळातील समाजकारणाने आणि राजकारणाने प्रभावित झालेले होते. प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या शेतीप्रश्नावरील विचारांचा टीकात्मक आणि तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

४) फुले आणि टिळक यांची सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी:

म.फुले आणि लो.टिळक यांच्या विचारांची माहिती घेत असताना त्या त्या वेळची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती पहाणे आवश्यक ठरते. प्रत्येक समाजसुधारकावर व राजकीय व्यक्तीवर त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचा प्रभाव पडत असतो.

म.फुले सामाजिक व राजकीय परिस्थिती:

म.फुल्यांच्या वेळची सामाजिक व राजकीय परिस्थिती ही पेशवाईचा शेवट व इंग्रजांचे आगमण या दुहेरी व्यवस्थेत सापडते. फुलेंच्या वेळी सामाजिक परिस्थितीवर ब्राम्हणांचे पूर्ण वर्चस्व होते. पेशवाईचा शेवट झाला तरी ही उच्च वर्णियांचा पगडा या समाज व्यवस्थेवर होता. धर्माच्या नावाखाली सर्वसामान्य माणसांची पिळवणूक होत होती. रुढी, चाली, परंपरा यांचे प्राबल्य समाजावरती होते. इंग्रजी राजवटीने या सामाजिक परिस्थितीत बदल करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. स्पृश-अस्पृश्यता मोठया प्रमाणावर पाळली जात होती. शिक्षणाच्या प्रसाराचा अभाव होता. जी परिस्थिती समाजिक तीच राजकीय परिस्थितीची. पेशवाईत व इंग्रजी राजवटीत सर्वसामान्य व्यक्तीना कोणत्याही प्रकारचे राजकीय हक्क नव्हते. सत्तेचे केंद्रीकरण या कालात दिसून येते. १८२९ साली बेंटिंग सतीबंदीचा कायदा केला.

याला मोठया प्रमाणात विरोध झाला परंतु त्यात बदल झाला नाही. सामाजिक सुधारणात बदल करण्याचे प्रयत्न सुरु होण्याचे चिन्ह दिसत होते.

लो. टिळक:

म. फुलेंच्यापेक्षा टिळकांच्या काळात सामाजिक व राजकीय परिस्थितीत बदल घडून येत होता. म. फुलेंनी अस्पृश्यांच्यासाठी व मुलींच्यासाठी शाळा काढल्या, इंग्रजी सरकारने अनेक सामाजिक सुधारणेचे कायदे केले. यामध्ये प्रामुख्याने विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक, समंती विधेयक, इत्यादी कायदे करुन समाजातील अनिष्ठ रुढी बंद करण्याचा प्रयत्न केला. याचबरोबर शिक्षणाचा प्रसार करण्यासहि सुरवात केली. समाजामध्ये अनेक समाज सुधारक समाजामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत होते. त्यांनी अनेक संघटना स्थापून हे कार्य चालू ठेविले होते. एकूण टिळकांच्या प्रारंभीच्या काळात सामाजिक परिस्थितीत हळू हळू बदल घडून येत होता. कनिष्ठ जातीतील लोक आपल्या हक्काबाबत हळूहळू जागृत होत होते.

राजकीय परिस्थितीत मात्र फारसा फरक पडला नव्हता. इंग्रजानी राजकीय हक्क लोकांना दिले नव्हते, उलट सर्वसामान्यांची कोंडीच केली होती. यातूनच १८५७ चे बंड घडून आले. या बंडामुळे लोकांच्या राजकीय अपेक्षा वाढल्या. त्यांना अधिकाराची जाणीव होत राहिली. यातूनच राणीने जाहिरनामा प्रसिध्द करुन काही हक्क लोकांना देऊ केले. सुशिक्षित तरुणांनी संघटना स्थापन करुन राजकीय हक्कांची मागणी करण्यास सुरवात केली. यातूनच काहीजनांनी इंग्रजी राजवटीस गुप्त किंवा उघड विरोध सुरु केला. १८७९ साली वासुदेव बळवंत फडके यांनी इंग्रजाविरुध्द बंडे केली. त्यात स्वराज्य स्थापनेची दृष्टी होती. ती बंडे यशस्वी होणे कठीण होते. पण इंग्रजी राज्याविरुध्द असलेला असंतोष त्यांनी सक्रिय व्यक्त केला."[१] राजकीय असंतोष वाढतच राहिला

यातूनच १८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली.

राष्ट्रीय कॉंग्रेसचे ला. टिळक हे खंदे पाठीराखे होते. भारतातील सर्व प्रश्न जर व्यवस्थितरित्या सोडावयाचे असतील तर लोकांच्या हातात राजकीय सत्ता आली पाहिजे असे त्यांचे मत होते. मात्र म.फुले कॉंगेसच्या हेतूबाबत साशंक होते. कारण बहुजनसमाजात जर ख-या अर्थाने जागृती झाली नाही तर राजकीय सत्ता ब्राह्मणांच्या हातात केंद्रित होईल व ते त्याचा वापर जमीनदारी, सावकारशाही, भिक्षुकशाही बळकट करण्यासाठी करतील अशी साधार भीती त्यांना वाटत होती. त्यामुळे शेती प्रश्नाचे महत्त्व जरी दोघांनाही वाटत होते तरी त्यांची त्यामागची कारणमीमांसा वेगळी होती.

५) म.फुले आणि लो.टिळक यांना शेती प्रश्नाचे वाटणारे महत्त्व:

म. फुले आणि लो. टिळक यांना शेतीप्रश्नाविषयी दोघानाही महत्त्व वाटत होते. शेती हा आपल्या संपूर्ण जीवनमार्गाचा प्रमुख गाभा आहे याबद्दल दोघांचे ही एकमत होते मात्र शेती प्रश्नावरचे वाटणारे महत्त्व याची कारणे मात्र वेगवेगळी होती. एकाला गुलामगिरी विरूद्ध लढा द्यायचा होता तर दुस-याला राजकीय सत्ता हस्तगत करायची होती.

म.फुले:

म.फुले यांना शेती प्रश्नाचे महत्त्व वाटले याला महत्त्वाचे कारण म्हणजे ब्राह्मणवर्गाचे शेतक-यांच्यावर असलेले प्राबल्य आणि यातून कर्जबाजारीपणामुळे हैराण झालेला शेतकरी याची सुटका यातून करावयाची असेल तर त्याचा मुख्य व्यवसाय शेती हाच सुधारला पाहिजे. या दृष्टीकोणातूनच शेतीप्रश्नाचे त्यांनी विश्लेषण केले आहे. महाराष्ट्रा-

तील शेतीला अनेक प्रश्न भेडसावत आहेत. असे फुल्यांना वाटते. शेतीचा मागासलेपणा, दुष्काळ, शेतसारा, आधुनिक शेती ज्ञानाचा अभाव या प्रश्नांची योग्य प्रकारे सोडवणूक झाली तरच शेतक-यांना चांगले दिवस येतील असे म.फुलेना वाटत होते. शेतीच्या प्रश्नाचे महत्त्व पटले होते. म्हणूनच त्यांनी खेडयापाडयातील या शेतकरी कष्टक-यांचे अज्ञान व दारिद्र्य हे ईश्वरनिर्मित नसून त्याचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत आहे हे त्यांनी ओळखले. म्हणून या व्यवस्थेतील धर्माधिष्ठित बौध्दिक गुलामगिरी, सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषण या प्रश्नाकडे प्रथम लक्ष दिले.[२]

लो. टिळक:

लो. टिळकांनी शेती प्रश्नांचे महत्त्व वाटून ते सोडविण्यासाठी व त्यावरील उपायासाठी त्यांनी आपल्या "केसरी" या दैनिकातून लिखाण केले आहे. इंग्रजांच्या साम्राज्यशाहीतून होणारी शेतक-यांची आर्थिक पिळवणूक यामुळे टिळकांचे शेती प्रश्नाकडे लक्ष गेले. शेतसारा दुष्काळ व त्यावरील अपु-या उपाययोजना, रयतवारीपध्दत जमिनीची मालकी, शेतक-याना शेतीसाठी मदत इत्यादी शेतीला भेडसावणा-या प्रश्नांचे टिळकांनी विश्लेषण केले आहे. हे प्रश्न शेतकरी दरिद्री बनण्यास कारणीभूत आहेत असे टिळकांना वाटत होते म्हणूनच त्यांनी या प्रश्नांचा उहापोह केला आहे.

वरील प्रमाणे म.फुले व लो. टिळक या दोघांनाही शेतीव्यावसायाला भेडसावणा-या प्रश्नाविषयीचे महत्त्व पटले होते. मात्र या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा होता, ते प्रश्न सोडविण्यासाठी अवलंबिलेले मार्ग वेगवेगळे होते. टिळकांनी या शेतीच्या प्रश्नाचे महत्त्व वाटले यापाठीमागे त्यांचा राजकीय दृष्टीकोन होता ते राजकीय चळवळीतले आघाडीचे नेते होते. ८०% शेतीवर अवलंबून असणारा शेतकरी जोपर्यंत राष्ट्रीय चळवळीत सहभागी होत नाही तोपर्यंत या चळवळीस सर्वव्यापी

स्वस्थ येणार नाही हे ओळखूनच त्यांनी शेती प्रश्नाविषयी शेतक-यां-विषयी सहानुभूती दाखविली.

शेती प्रश्नावर म.फुले यांनी जास्त सर्वांगीण विचार केला होता. कारण त्यांना शेतक-यांचा केवळ आर्थिक प्रश्नच सोडवायचा नव्हता तर शेतक-यावर जी धार्मिक सामाजिक आर्थिक व राजकीय गुलामगिरी हजारोवर्षे लादण्यात आली होती त्या गुलामगिरीतून त्यांना त्यांची सुटका करावयाची होती यासाठी त्यांनी आखलेला कार्यक्रम हा जास्त व्यापक व दूरगामी आणि त्या काळातील राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वरिष्ठ वर्गीय समन्वयाच्या राजकारणाच्या विरोधात जात होता.

शेतक-यांची तत्कालीन परिस्थिती:

शेतक-यांच्या तत्कालीन परिस्थिती विषयी म.फुले आणि लो.टिळक या दोघांनीही लेखन केले आहे. शेतक-यांची परिस्थिती विषयी दोघांनीही आपल्या दृष्टीकोनातून मते मांडली आहेत.

म.फुले:

शेतक-यांच्या परिस्थिती विषयी लिहिताना म्हणतात, "शेत-सारा, भटभिक्षुकशाही, पुरोहित कामगार वर्ग, सावकार, दुष्काळ, रोगराई, वाढता कर्जबाजारीपणा यामुळे शेतक-याची परिस्थिती ही अत्यंत बिकट व हालाखीची बनली होती. नवीन पिकांचा अभाव, दुय्यम व्यवसाय बुडाले, वाढता शेतसारा तो भागविण्यासाठी कर्जाची वारंवार उचल यामुळे शेतकरी एकवेळच्या अन्नास व अंगभर वस्त्रासही महाग झाला होता. शेतक-यांचे जीवनमान अगदी खालच्या दर्जाचे होते असे फुल्यांचे मत होते.

लो.टिळक:

शेतक-यांच्या तत्कालीन परिस्थितीचे वर्णन केले आहे ते म्हणतात,

शेती करण्याची जुनीच पध्दत कायम राहिल्यामुळे ब्रिटिशांनी लागू केलेली "रयतवारी" त्यातुन त्यांचा शेतसारा वसूल करण्याची पध्दत, पावसावर आवलंबून असणारी शेती यामुळे वारंवार पडणारे दुष्काळ, पाटबंधा-याचा अभाव शेतीवर लोकसंख्येचा वाढता भार यामुळे शेतकरी गरिब बनला आहे.

शेतक-यांच्या सध्याच्या परिस्थितीचे वर्णन करीत असतांना म.फुले आणि लो.टिळक या दोघांनही वाढता शेतसारा, दुष्काळ, नोकरशाही व लष्कर यावर खर्च, शेती व उद्योग यांची फारकत यावर भर दिला आहे याबाबत दोघांचेही एकमत आहे. फुल्यांनी भिक्षुकशाही-सही शेतक-यांच्या दुरावस्थेस जबाबदार धरले आहे. सावकार व ब्राह्मण नोकर यांची पिळवणूक त्यांच्या जातीय ऐक्यामुळे व दृष्टिकोणामुळे कुणबी शेतक-यास असहय झाली आहे असे त्यांचे मत होते.

७) <u>शेतक-यांच्या दुरावस्थेची कारणे म.फुले व लो.टिळक यांचे विचार:</u>

इंग्रजी राजवटीमध्ये शेतीव्यवसाय हा प्रमुख असून देखील शेतक-यांची परिस्थिती मात्र गरिबीचीच राहिली व ती सतत वाढतच गेली या त्यांच्या दुरावस्थेचा शोध घेण्याचा प्रयत्न टिळक व फुले या दोघांनीही केला आहे तो पुढीलप्रमाणे:

अ) <u>म.फुले:</u>

शेती व्यवसायाचा मागसलेपणा, नवीन राज्य, नवे कायदे, नवे अंमलदार यामुळे शेतक-यांची पिळवणूक करणारे नवीन काही घटक निर्माण झाले असे म.फुलेंचे मत होते, यामध्ये त्यांनी भटभिक्षुकशाही, नोकरशाही व्यापारी व सावकार, सरकार या घटकांचा समावेश केला. यामुळे शेतक--यांची आर्थिक दुरावस्था झाली असे म.फुलेंचे मत होते.

ब) लो.टिळक:

इंग्रजी राजवटीमध्ये वारंवार पडणारा दुष्काळ, शेतसारा, उद्योगधंद्याचा अभाव, सरकारचे साम्राज्यवादी धोरण यामुळे शेतकरी दारिद्री बनला. सरकारच्या सहानुभूतीशून्य धोरणामुळे त्यांची उपासमार होत होती. या अवस्थेस इंग्रजी साम्राज्यवादाबरोबरच इतरही काही कारणे आहेत. यामध्ये सरकार, नोकरशाही, सावकारशाही, शेतीवर सर्व बोजा इत्यादी कारणे शेतक-यांच्या दुरावस्थेस होती असे टिळकांचे मत होते.

वरील प्रमाणे म.फुले आणि लोकमान्य टिळक यांनी शेतक-यांच्या दैनावस्थेची कारणे सांगितली आहेत. म.फुलेंनी यामध्ये प्रामुख्याने ब्राह्मण-शाहीला दोष देऊन शेतक-यांच्या सर्व नाशास ब्राह्मण कारणीभूत आहेअसे प्रतिपादन केले. शेतक-याच्या अशिक्षितपणाचा व अंधश्रध्दाळू पणाचा फायदा घेऊन भिक्षुकशाही या अडाणी शेतक-यांची सर्व बाजूंनी शोषण करते. ब्राह्मणांचे सर्व क्षेत्रात असलेले वर्चस्व, नवीन शिक्षणामुळे समाजातील तो सर्वश्रेष्ठ वर्ग बनून शेतक-यांचे आर्थिक शोषण करतो. सरकारला सहानुभूती शेतक-याविषयी आहे. मात्र प्रशासनामध्ये असलेल्या ब्राह्मण वर्गाच्या प्राबल्यामुळे सरकार या पासून प्रवृत्त होते, त्यामुळे शेतकरी अधिकच दारिद्री बनत गेला आहे, असे म.फुलेंना वाटते.

मात्र लो.टिळकांनी शेतक-यांच्या दैन्यावस्थेला सरकारला, त्याच्या साम्राज्यवादी धोरणालाच प्रामुख्याने जबाबदार धरले आहे. टिळकांच्या मते शेतकरी इंग्रजी राजवटीतच अधिक दारिद्री बनला, दुष्काळ, त्यावर उपाययोजनेचा अभाव, वाढता शेतसारा, इतर उद्योगधंद्याचा अभाव, निरनिराळे फंड, व्यापारी, दलाल, परदेशी मालावरील जकात माफ,

सावकारशाहीवरील वाढती बंधने इत्यादी सर्व कारणे ही इंग्रजी राज्याच्या आर्थिक शोषणाच्या धोरणाचाच परिणाम होता. या सर्व कारणामुळे शेतक-यांचे आर्थिक शोषण झाले व त्याला एकमेव कारण सरकारच होते असे टिळकांचे मत होते.

वरील प्रमाणे लो.टिळक व म.फुले यांची शेतक-यांच्या दैन्यावस्थेवरील मते पाहिल्यावर दोघांचाही दृष्टीकोन एकांगी स्वरूपाचा होता हे आपल्या लक्षात येते वास्तविक अशा प्रकारची शेतक-यांची परिस्थिती होण्यासाठी साम्राज्यशाही व ब्राह्मणशाही कमीजास्त प्रमाणात कारणीभूत होते हे मान्यच करावे लागेल. फुलेंनी सर्व दोष ब्राह्मणशाहीला दिलेला आहे. हे जरी बरोबर असले तरी या कार्याला पाठीशी घालणारे इंग्रजांचे धोरण ही कारणीभूत होते हे मान्यच करावे लागेल. त्याचप्रमाणे इंग्रजानीच आर्थिक शोषण केले याला त्यांचे आर्थिक धोरणच कारणीभूत होते. सावकारांनी शोषण न करता शेतक-यांना मदत केली हे टिळकांचे मत ही पटत नाही. कारण सावकारांनी शेतक-याच्या अडचणीचा व अज्ञानीपणाचा फायदा घेऊन सरकारचे नियम धाब्यावर बसवून शेतक-यांचे आर्थिक शोषण केले.

फुले व टिळक अशा वासाहतिक समाजाचे प्रतिनिधित्त्व करीत होते जेथे शेती व उद्योग यांचा भांडवली विकास झालेला नव्हता. सरंजामशाही रचना पुरती उखडली नव्हती. त्यामुळे इंग्रज साम्राज्यशाही शेतक-यांच्या शोषणास मुख्यत: जबाबदार आहे हे वास्तव फुल्यांनी लक्षात घेतले नाही. उलट इंग्रजांच्यामुळे शेतक-यांचे कल्याण होईल असा अवास्तव विचार केला तर लो.टिळकांनी सर्व दोष सरकारच्या माथ्यावर मारून या देशातील वरिष्ठ वर्ग, सावकार व नोकरदार यांची बाजू घेतली. इंग्रजांच्या शोषणाच्या धोरणाचे ते ऐतद्देशीय साहयकर्ते आहेत व जनतेचे शत्रू आहेत हे वास्तव त्यांनी नाकारले.

## ८) दुष्काळ परिस्थिती टीकात्मक परिक्षण:

शेतक-याला इंग्रजी राजवटीमध्ये भेडसावणारा मुख्य प्रश्न म्हणजे वारंवार पडणारा दुष्काळ. या दुष्काळावरती ही म.फुले व लो.टिळक यांनी विस्तृत विवेचन केले आहे.

### म.फुले:

म.फुले यांनी दुष्काळाविषयी लिहिताना म्हणतात, दुष्काळ ही जरी नैसर्गिक आपती असली तरी सरकारने त्यावर योग्य उपाययोजना करावी. दुष्काळामुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान होते. यासाठी पाणी साठविण्यासाठी तलावे, बंधारे सरकारने बांधून दुष्काळाची तीव्रता कमी करावी. दुष्काळ पडल्यास शेतक-यांना उपजीविकेसाठी रोजगार उपलब्ध करुन द्यावा. खास दुष्काळी कामे काढावीत व शेतक-यांची उपासमारी थांबवावी.

### लो.टिळक:

लो.टिळक यांनी दुष्काळाविषयी आपल्या "केसरी" या वर्तमान पत्रातून विस्तृत लेखन केले आहे व त्याची कारणे व त्यावर उपाययोजना ही सुचविल्या आहेत. दुष्काळ वेळोवेळी का पडतो व त्यावर कायम स्वरुपाच्या उपाय योजले पाहिजेत. दुष्काळात अन्नावाचून कोणीही मरता कामा नये, दुष्काळ का पडला यापेक्षा दुष्काळामध्ये एक वर्ष पुरेल इतके धान्य का शिल्लक राहात नाही, धान्य विकत घेण्याऐवढे पैसे शेतक-याजवळ का असू नयेत या कारणांचा विचार करणे आवश्यक आहे असे टिळकांचे मत होते. दुष्काळासाठी आमच्याकडून पैसे घेऊन दुष्काळाचा विमा उतरला आहे. यास्तव तर दुष्काळात सर्वांचेच जीव सरकारने बचाविले पाहिजेत.[3]

दुष्काळामुळे सरकारने सा-यामध्ये सूट द्यावी, गावाच्या आसपास कामे काढून मजूरी द्यावी, तगाईच्या रूपाने शेतीच्या कामाकरिता कर्जाऊ पैसे द्यावेत इत्यादी सूचना टिळकांनी केल्या होत्या. दुष्काळ निवारण्यासाठी फॅमिन रिलीफ कोडमधील तरतुदींची अमंल बजावणी करावी, उदा. फॅमिन रिलीफ कोड कलम १५१ यात असे सांगितले आहे की, साळी व कोष्टी यांस दुष्काळ-कामगिरीवर खडी फोडण्यास न सांगता त्यांच्याकरिता त्यांच्या धंद्याची कामे काढूनत्यांस मदत करावी व जरुर पडल्यास थोडीबहुत फुकटहि मदत द्यावी."[४] गुराढोरांना चरण्यासाठी जंगले खुली करावीत, कडब्याचे दर कमी करावेत इत्यादी सूचना लो.टिळकांनी केल्या होत्या. दुष्काळामध्ये लोकांच्यावरती सक्ती ही केली जाऊ नये. "दुष्काळाच्या वेळी गरीब लोकांस पोटास देणे हे सरकारचे कर्तव्य आहे आणि त्यांस काम सांगणे ते केवळ धर्मार्थ देणगीचा दुरुपयोग होऊ नये एवढ्याकरिताच होय."[५]

वरील प्रमाणे फुले व टिळक यांनी दुष्काळाविषयी आपली मते मांडली आहेत. यामध्ये फुल्यांच्या पेक्षा टिळकांनी अतिशय चिकित्सक पध्दतीने दुष्काळाची कारणे, उपाययोजना, सरकारचे कर्तव्य, इत्यादी विषयक विश्लेषण केले आहे. टिळकांनी दुष्काळाच्या उपाययोजनेबाबत व दुष्काळातील शेतक-याच्या हालाखीस सरकारला दोष दिला आहे. सरकारच्या नियोजना अभावी हजारो लोक मृत्यूमुखी पडत आहेत. कित्येक घरदार सोडून देशोधडीस लागले आहेत. दुष्काळामध्ये शेतक-यांचे जवळ होते नव्हते तेवढे सर्वच तो गमावून बसतो व याला कारण सरकारच आहे असे टिळक म्हणतात.

म.फुलेने दुष्काळामध्ये शेतक-याच्या होणा-या हालाखीस ब्राह्मणशाही, नोकरशाही व सावकार यानाच जबाबदार धरले आहे.

सरकार दुष्काळावरती उपाय योजते परंतु नोकरशाही योग्य ती अंमलबजावणी करत नाही, दुष्काळासंबंधी सरकारला योग्य ती माहिती दिली जात नाही. तर दुष्काळाचा फायदा घेऊन सावकार शेतक-यांना मोठया प्रमाणावर कर्जे देऊन जमिनी हडप करतात असे फुल्यांचे मत होते.

दुष्काळ पडला असता केवळ सरकारला वा सावकारात दोष न देता लोकांच्या पुढा-यांनी शेतक-यात जागृती करावी. सरकारकडे काम मागावे. नोकरशाही आपणाहून काम करणार नाही. त्यासाठी त्यावर लोकमताचा अंकुश आणावा त्यासाठी लोकांची चळवळ उभारावी इत्यादि अतिशय मोलाचे असे विचार लो. टिळक यांनी या संदर्भात मांडले आहेत.

९) म.फुले व लो.टिळक यांनी सुचविलेली उपाय योजना:

म.फुले व लो.टिळक यांनी शेतक-यांची बिकट झालेली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी काही उपाय सांगितले आहेत.

म.फुले:

शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी म. फुले यांनी सांगितलेले उपाय पाहिले की त्यांच्या चौफेर दृष्टीचा परिचय होतो त्याच बरोबर त्यांना शेतक-याच्या परिस्थितीची असलेली जाणीव ही स्पष्ट होती. यामध्ये ज्यांच्याकडून शेतक-यांचे आर्थिक शोषण होते त्यांच्या मध्ये जागृती करणे आवश्यक आहे. फुलेना वाटते यासाठी त्यांनी पुढील घटकांच्यामध्ये जागृती करणे आवश्यक आहे.

१) भिक्षुकशाही विरुध्द जागृती:

अज्ञानी शेतक-यांची भिक्षुकशाहीकडून सर्वात जास्त आर्थिक शोषण

होते हे थांबविण्यासाठी शेतक-याच्या मनात भिक्षुकविरूद्द जागृती करने आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या शोषणाची जाणीव करून दिली पाहिजे, त्यांच्याविरूद्द उठाव, बंड करावे असे फुले सांगतात.

२) नोकरशाही विरूद्द जागृती:

नोकरशाहीमध्ये असलेले ब्राह्मणांचे वर्चस्व आणि या वर्चस्वामुळे ते शेतक-यांचे आर्थिक शोषण करतात. जातभाईना सवलती देतात, शेतक-यांमध्ये क्षुल्लक कारणावरून तंटे लावून दोन्हीकडून पैसे उपटतात. जो जास्त पैसे देईल त्याच्या सारखा निकाल लागेल अशा प्रमाणे कागदपत्रे करणे"[६] इत्यादी मार्गाने नोकरशाही कशी शोषण करते याची जाणीव शेतक-याना करून देऊन त्यांच्याविरूद्द जागृती करणे आवश्यक आहे असे फुलेना वाटते.

३) सावकारशाही विरूद्द जागृती:

कर्जे देऊन दामदुपटीने व्याज वसूल करून वसूल न झाल्यास जमिनी काढून घेणे सावकार शेतक-याच्या नाशास कसा कारणीभूत आहे, अज्ञानीपणाचा कसा फायदा घेतो याची जाणीव शेतक-यांना करून देऊन त्यांना सावकारांविरूद्द संघटित केले पाहिजे असे फुलेना वाटते.

४) सरकारचा दृष्टीकोण बदलणे:

फुले म्हणतात सरकारचा शेतक-यांकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. शेतक-याची भिक्षुकशाही नोकराही व सावकारशाही कडून कशी आर्थिक पिळवणूक होते याची जाणीव सरकारला करून देऊन त्यावर उपाय योजना करण्यास भाग पाडले पाहिजे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, K...

वरील प्रमाणे जागृती करून शेतक-यांचे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत व यासाठी शेतक-यांच्यामध्येच काही मूलभूत बदल केले पाहिजेत यासाठी १) विद्येचा प्रसार, २) सत्यधर्माचा प्रसार, ३) अज्ञान दूर करणे या गोष्टीचा प्रसार शेतक-यांच्यामध्ये करणे आवश्यक आहे असे फुलेंयानी सांगितले आहे. म.फुलेनी शेतक-याची स्थिती सुधारण्याबरोबरच शेती सुधारणाही आवश्यक मानली आहे यासाठी ते काही पुढील उपाय सांगतात. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी बंधारे बांधणे, विहिरी खणण्यासाठी ... शेतांचे सर्वेक्षण करणे, चांगल्या जनावरांची पैदास करणे, पीकांचे संरक्षण करणे शेती मालाची प्रदर्शने भरवावीत इत्यादी.

लो. टिळक:

म.फुलेप्रमाणेच लो.टिळकांनीही शेतक-यांची दयनीय अवस्था सुधारण्यासाठी काही उपाय सांगितले आहेत.

१) सरकारी धोरणातील बदल:

शेतक-याच्या आर्थिक शोषणास प्रामुख्याने सरकारच जाबाबदार असल्यामुळे शेतक-याची उन्नती होण्यासाठी त्यांना चांगल्या प्रकारचे जीवन जगण्यासाठी सरकारच्या धोरणातच बदल घडवून आणणे आवश्यक. शेती-साठी आवश्यक असलेली उपाय योजने, शेतसा-यामध्ये सूट देणे, दुष्काळात त्याला मदत करणे यासाठी सरकारी धोरण शेतक-याला अनुकूल करणे आवश्यक आहे असे लो.टिळकांनाच वाटते. शेतक-यांचे अज्ञान घालविण्यासाठी त्याच्या शिक्षणाची सोय करणे.

२) शेतक-याच्यामध्ये त्यांच्या अधिकाराबाबत जागृती करणे:

शेतक-यांच्या अज्ञानामुळे त्याची पिळवणूक होते. सरकारने

योजिलेल्या उपाययोजना, शोषण कोणाकडून होते याची जाणीव त्याच्यामध्ये निर्माण होण्यासाठी शेतक-यामध्ये जागृती निर्माण होणे आवश्यक आहे.

३) <u>शेतीसुधारणा व धंदेशिक्षण:</u>

शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेतीमध्ये शास्त्रीय पध्दतीने पीके घेणे, पावसावर अवलंबून असणारी शेती कमी करणे, शेतकरी पेढया काढणे, शेतीवरचा बोजा कमी करण्यासाठी धंदे शिक्षण टिळकांनी आवश्यक मानले.

४) <u>सावकार शाहीवर माफक नियंत्रण:</u>

सावकार शेतक-याला अडचणीच्यावेळी मदत करतात, शेतक-याचे सावकारावाचून चालणार नाही म्हणून सावकारी व्यवस्थीत चालण्यासाठी योग्य तीच नियंत्रणे सावकारावरती घालावीत व त्याला शेतक-याला कर्जे देऊन द्यावीत त्यामुळे शेतक-याच्या अडचणी कमी होतील.

५) <u>शेती आणि उद्योग यांच्यात परस्पर संबंध:</u>

जमिनीत पिकणारे उत्पादन शेतक-यास पुरत नाही यासाठी शेती आणि उद्योग यांच्यात परस्पर संबंध प्रस्थापित करुन शेतक-यांची दैनावस्था कमी करता येईल असे टिळकांना वाटते.

वरील प्रकारची उपाययोजना टिळकांनी व फुलेनी सांगितली आहे. शेतक-याची आर्थिक स्थिती सुधारावी याविषयी दोघानाही सहानुभूती वाटते परंतु ती कोणत्या प्रकारे सुधारता येईल याविषयी मतभिन्नता त्यांच्या लिखाणात पाहायला मिळते.

शेती प्रश्नावर म.फुले आणि लो.टिळक यांनी मूलगामी उपाय सूचविले आहेत. दोघांनाही शेतीमध्ये सुधारणा अभिप्रेत आहे. धंदेशिक्षण

शेतक-याचे अज्ञान दूर करणे. शेती शाळा व कॉलेजे काढणे,आधुनिक पध्दतीने शेती करण्याचे शिक्षण देणे, धरणे, ताली व पाट बांधणे. शेती क्षेत्रावर सरकारने जास्त पैसा खर्च करणे याबाबत फुले व टिळक यांचे एकमत आहे. त्यांच्या विचारात बरेच साम्य आहे.

दोघांच्या विचारात मूलभूत फरक सामाजिक व सांस्कृतिक विकासाच्या संदर्भात आहे. फुले जोपर्यंत शेतकरी ब्राह्मणी धर्माची सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक गुलामगिरी तोडून टाकीत नाही, ख-या सत्यधर्माचा उपासक बनत नाही, भिक्षुकशाहीचे बंड मोडीत नाही तो पर्यंत तो सुधारला आहे असे मानीत नाही. त्यांना शेतकरी या अर्थाने शहाणा करावयाचा आहे. त्यामुळेच ते भिक्षुकशाही व सावकारशाहीचे कडवे विरोधक आहेत.

लो.टिळक याबाबत सनातनी असल्यामुळे या प्रश्नाची केवळ आर्थिक बाजू पाहतात. शेतक-याच्या सांस्कृतिक विकासात त्यांना रस नाही. सावकारशाही व एतद्देशीय नोकरशाहीवर देखील त्यांची करडी नजर नाही. सावकाराची भूमिका त्यांना मान्य आहे. संपूर्णसावकारशाहीचे निर्मूलन त्यांना धोक्याचे वाटते.

टिळक हे भांडवलशाही वर्गाचे एक प्रमुख पुढारी असल्यामुळे त्या वर्गाच्या हिताची त्यांना अचूक जाण आहे. म्हणून शेती व उद्योग कृषी उत्पादनावर आधारलेले उद्योग व शेतक-याच्या अतिरिक्त पैशाची उद्योगात गुंतवणूक याबाबत त्यांनी आपले विचार मांडले आहेत. म.फुल्यांच्या विचारांना तेवढा आर्थिक पक्का गाढता आलेला नाही.

१०) <u>शेतीसुधारणा व तत्कालीन राजकारण टिळक व फुलेंचे विचार:</u>

म.फुले आणि लो.टिळक या दोघांनाही तीक्ष्ण राजकीय जाण

होती. शेतीप्रश्न महत्त्वाचा आहे व पुढच्या राजकारणाची बीजे त्यात गुंतलेली आहेत हे त्यांना कळत होते. पण दोघांच्या विचारावर काही मर्यादा होत्या.

म.फुले यांच्या मते सावकारशाही नोकरशाही व ब्राह्मणशाही हे शेतकऱ्यांच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत. ब्राह्मण समाजावर आपले वर्चस्व टिकविण्यासाठी काँग्रेस पक्ष स्थापन करून जास्तीत जास्त सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या हातात सत्ता आली तर वरील तीन शाहया बळकट होतील. म्हणून काँग्रेसला विरोध केला पाहिजे. त्यासाठी त्यांनी सर्व ब्राह्मणेतरांनी शूद्रादि अतिशूद्रांनी एकत्र येऊन राष्ट्रीय चळवळीच्या विरोधात इंग्रजास पाठिंबा दिला पाहिजे. असे विचार मांडले. इंग्रजांशी सहयोग हे त्यांच्या विचारातील एक महत्त्वाचे सुत्र होते.

ताबडतोबीच्या राजकारणाचे हे सूत्र असले तरी फुल्यांना नैसर्गिक अधिकारांवर आधारलेले राज्य स्थापन करावयाचे होते, हे लोकशाही राज्य शेतकऱ्यांचे राज्य होते. हा एक प्रकारचा "युटोपिया" होता. असे आदर्श राज्य शहाणा व सुशिक्षित शेतकरी प्रस्थापित करील असा त्यांचा विश्वास होता.

लो.टिळक हे भांडवली विकासाचे पुरस्कर्ते होते. व त्यासाठी त्यांना राजकीय सत्ता हवी होती. ही सत्ता इंग्रजाविरुद्ध चळवळ केल्या शिवाय मिळणार नाही व ही चळवळ शेतकऱ्यांच्या पाठिंबा मिळाल्याशिवाय व्यापक बनणार नाही हे त्यांना माहित होते. म्हणून शेतकऱ्यांच्या असंतोषाचा उपयोग सरकारविरुद्ध जास्तीत जास्त क्षोभ निर्माण करण्यासाठी

त्यांनी प्रयत्न केला. सर्व शेतक-यांनी राष्ट्रीय सभेत सामील व्हावे असे त्यांनी आवाहन केले. मिळालेल्या सत्तेचे वाटप कसे करावयाचे याबाबत ते गप्प राहिले. कारण फुले म्हणतात त्याप्रमाणे ही सत्ता शेतक-यांच्या हातात न जाता ब्राम्हण वर्गाच्याच हातात जात होती. या टीकेला त्यांनी उत्तर दिले नाही त्यांच्या काँगेसचे स्वरुप ब्राम्हणी होते. व त्यामुळे सत्ता वाटपात असमतोल निर्माण होणार होता.

लो. टिळक हे ही लोकशाही राज्याचे पुरस्कर्ते होते पण म. फुल्यांइतके त्यांचे विचार प्रागतिक नव्हते. स्वतंत्र भारतात शेतक-यांचे राज्य स्थापन करण्याचे तत्त्व त्यांना अभिप्रेत दिसत नाही. त्याचप्रमाणे देशाच्या भांडवली विकासावर त्यांचा भर होता. मात्र म. फुले यांचे विचार समाजवादास जवळचे होते.

म. फुले व लो. टिळक यांच्या विचारातील एक प्रमुख विसंगती म्हणजे ताबडतोबीच्या राजकारणात टिळक फुल्यांपेक्षा जास्त जहाल होते तर दूरगामी राजकारणात म. फुले टिळकांपेक्षा जास्त पुरोगामी व प्रागतिक होते. त्यामुळे राजकीय चळवळीच्या सरकार विरोधी कार्यक्रमाचा जास्त सुक्ष्म व काटेकोर विचार टिळकांनी केला तर या चळवळीची खरी उद्दिष्टे कोणती असावी याचा उहापोह फुल्यांनी केला.

११) <u>महाराष्ट्रातील शेतीप्रश्न, फुले व टिळक टिकात्मक परिक्षण:</u>

महाराष्ट्रातील शेती प्रश्नावरील फुले व टिळक यांची मते वरील प्रमाणे पाहिले असता असे दिसून येते कि या दोघांनाही शेतीच्या प्रश्ना-बद्दल व महाराष्ट्रातील शेतक-यांची दैनावस्था त्यांची आर्थिक हलाखीची परिस्थिती याविषयी विवेचन केले आहे. मात्र दोघांच्याही परिस्थितीत मूलभूत फरक आढळून येतो. म. फुले हे समाजसुधारक होते तर

लो.टिळक हे राजकारणी होते. फुले यांच्या विचारावर आदर्शवादाचा पगडा दिसून येतो. तर टिळकांच्या विचाराचा राजकारणाची झालक दिसून येते.

म.फुले आणि लो.टिळक यांनी शेती प्रश्नाचा विचार करीत असताना त्या दोघांनी केलेल्या योगदानाचा आपण विचार केला पाहिजे. म.फुले यांनी शेतक-याच्या दैन्यावस्थेचे प्रत्ययकारी चित्रण करुन त्यांच्या विविध समस्यावर उपाययोजना सुचविल्या. त्यांनी शेतक-यांचे राज्य स्थापन करण्याचे स्वप्न रंगविले व शेतक-यांच्या दारिद्र्याची सर्वांगिण मीमांसा केली. शेतक-यास आत्मस्थितीचे ज्ञान झाले पाहिजे त्याची सामाजिक धार्मिक आर्थिक व सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्तता झाली पाहिजे त्याला सत्तेत मुख्य वाटा मिळाला पाहिजे हे त्यांनी प्रथमत: सांगितले. लो. टिळकांनी वासाहतिक समाजात साम्राज्यशाही धोरणामुळे शेतक-यांचे कसे शोषण होते याचे प्रत्ययकारक चित्र रेखाटले. त्यासाठी त्यांनी राजकीय चळवळ उभारण्यावर, सत्तेचे स्वरुप बदलण्यावर भर दिला व देशाच्या भांडवली विकासात शेतीचे महत्त्व प्रतिपादन केले.

या दोघांच्या विचारांचे परिशीलन करीत असतांना आपणास स्पष्ट दिसते की त्यांचे विचार एकांगी होते. इतर महत्त्वाच्या बाजूंचा त्यात समावेश करण्यात आलेला नव्हता. दोघांनीही शेतक-यातील विविध थरांचा पूर्ण विचार केला नव्हता. फक्त फुलेच शेतमजुरीच्या वेतनाबाबत व शोषणाबाबत जागृत असल्याचे दिसते. जमिन सुधारणा जमिन वाटप, कसेल त्याची जमिन वगैरे विचार त्यांच्या लिखाणात आढळून येत नाहीत पण फुल्यांनी तत्त्वत:"कसेल त्याची जमीन" चा पुरस्कार केला आहे पण तो विचार त्यांच्या चळवळीचा मुख्य भाग बनावयास ५० वर्षे वाट पाहणे क्रमप्राप्त होते. भांडवली विकासाचा पुरस्कार करणा-या लो.टिळकांचे याबाबतचे मौन अर्थपूर्ण आहे.

## - संदर्भ -

१) देवगिरीकर त्र्यंबक रघुनाथ — वासुकाका जोशी व त्यांचा काळ, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणे-२, एप्रिल, १९८८ पृ.१९६

२) सरदार गं.बा. — महात्मा फुले व्यक्ती आणि विचार, अभिनव वाचक चळवळ, मुंबई १४० नोव्हेंबर, १९८२, पृ.१

३) समग्र लोकमान्य टिळक खंड-३, केसरी प्रकाशन, पुणे १९७६, पृ. ४३९

४) उक्त पृ. ४५२

५) उक्त पृष्ठ ४६२

६) सरदार गं.बा. महात्मा फुले व्यक्ती आणि विचार पृ.१८७

७) कवडे पा.बा. — म.फुले यांचे चरित्र १९६८, पृ.१६२ व १२४.

.....